# <u>प्रेसनोट</u>

नाशिक,
दिनांक : १५/०१/२०१९

**आलोसे अंकुश दत्तु बोराटे, सहायक पोलीस निरीक्षक, नेमणुक मालेगाव तालुका पोलीस ठाणे, जि.नाशिक ग्रामीण यांना १०,०००/— रूपये लाचेची रक्कम स्विकारतांना अटक**

---

यातील महिला तक्रारदार यांचे मुलाविरुध्द मालेगाव तालुका पोलीस ठाण्यात बलात्काराचा गुन्हा दाखल असुन सदर गुन्हयात त्यास मा. मालेगांव न्यायालयाने जामिन मंजुर करुन पोलीस ठाण्यात हजेरी लावली होती. सदर हजेरीत सवलत देण्यासाठी तसेच तक्रारदार यांचे नावे पोलीस ठाण्यात दाखल असलेल्या इतर तक्रार अर्जाचे चौकशीत मदत करणेकरीता आलोसे अंकुश दत्तु बोराटे, सहायक पोलीस निरीक्षक, नेमणुक मालेगाव तालुका पोलीस ठाणे, जि.नाशिक ग्रामीण यांनी तक्रारदार यांचेकडे १०,०००/—रूपये लाचेची मागणी केल्याने तक्रारदार यांनी लाचलुचपत प्रतिबंधक नाशिक विभाग कार्यालयात तक्रार दिली होती.

तक्रारदार यांचे तक्रारीवरुन आज दिनांक १५/०१/२०१९ रोजी ला.प्र.वि. नाशिक पथकाने पडताळणी करुन सापळा आयोजित केला असता आलोसे अंकुश दत्तु बोराटे, सहायक पोलीस निरीक्षक, नेमणुक मालेगाव तालुका पोलीस ठाणे, जि.नाशिक ग्रामीण यांनी तक्रारदार यांचेकडे १०,०००/— रूपये लाचेची मागणी करुन सदर लाचेची रक्कम मालेगांव तालुका पोलीस स्टेशनमधील दुय्यम अधिकारी कक्षात स्विकारली असता त्यांना रंगेहात पकडण्यात आले आहे.

लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, नाशिक तर्फे नागरीकांना आवाहन करण्यांत येते की, कोणत्याही शासकीय कार्यालयामध्ये कोणी शासकीय अधिकारी/कर्मचारी किंवा त्यांचे वतीने कोणी खाजगी इसम लाचेची मागणी करीत असतील तर कृपया लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, नाशिक परिक्षेत्रातील कार्यालयाशी संपर्क साधुन निर्भिडपणे या कार्यालयाकडे तक्रार नोंदवावी.

कार्यालयीन वेळेनंतर वा सुट्टीचे दिवशी लाचलुचपत प्रतिबंधक विभागाचे कार्यप्रणाली बाबत वा तक्रारीबाबत माहिती पाहिजे असल्यास खालील मोबाईल क्रमांक व दूरध्वनीवर संपर्क साधावा महाराष्ट्रातील सर्व जनतेच्या सोईच्या दृष्टीने लाचलुचपत प्रतिबंधक विभागाकडे तक्रार करण्यासाठी **<u>लॅंडलाईन ते लॅन्डलाईन व मोबाईल ते लॅन्डलाईन अशी टोल फ्री नंबर १०६४</u>** ची सेवा सुरु करण्यांत आली असुन सदर क्रमांकावर लाचलुचपत प्रतिबंधक विभागाचे कार्यप्रणालीसंबंधी व करावयाच्या तक्रारीसंबंधी नागरीकांनी संपर्क साधावा.

| अनं | युनिटचे नांव | दूरध्वनी क्रमांक | **टोल फ्री नंबर** |
|---|---|---|---|
| १ | नाशिक | ०२५३—२५७५६२८, २५७८२३० | **१०६४** |
| २ | अहमदनगर | ०२४१—२४२३६७७ | **१०६४** |
| ३ | धुळे | ०२५६२—२३४०२० | **१०६४** |
| ४ | नंदूरबार | ०२५६४—२३०००९ | **१०६४** |
| ५ | जळगांव | ०२५७—२२३५४७७ | **१०६४** |

**( विश्वजीत जाधव )**
वाचक पोलीस उपअधीक्षक
पोलीस अधीक्षक,लाचलुचपत प्रतिबंधक
विभाग,नाशिक परिक्षेत्र, नाशिक करीता